***

जालना एज्युकेशन सोसायटीचे,
आर.जी. बगडिया आर्टस, एस.बी. लखोटिया कॉमर्स ॲण्ड आर.
बेझंजी सायन्स कॉलेज, जालना.

# राष्ट्रीय सेवा योजना, वरिष्ठ महाविद्यालय विभाग

**विशेष वार्षीक शिबीर - २०२३ - २०२४**

मौजे - डोंगरगांव (सायगाव), ता.बदनापूर, जि.जालना.

''चला पाणी वाचवू या । चला पाणी अडवू या।
गाव शिवारातील पाणी साठवू या ।।'
''पाण्याच्या थेंबा थेंबाची बचत करु या।
चला गड्यानो गाव पाणीदार बनवू या ।।'

- इंद्रजीत घुले

राष्ट्रीय सेवा योजना वरिष्ठ महाविद्यालय तर्फे राष्ट्रीय सेवा योजनेच्या स्वयंसेवकांसाठी ''युवकांचा ध्यास, ग्राम-शहर विकास'' या विषयावर विशेष श्रमदान शिबीराचे मौजे डोंगरगांव (सायगाव) , ता. बदनापूर, जि.जालना येथे दि. ०९ ते १५ जानेवारी २०२४ दरम्यान विशेष वार्षिक शिबीराचे आयोजन करण्यात आले.

दि. ०९ जानेवारी २०२४ रोजी शिबीरार्थींचे डोंगरगांव (सायगाव) , ता. बदनापूर, जि.जालना येथे सायंकाळी ०३.०० वाजता आगमन झाले. यावेळी विद्यार्थ्यांनी परिसराची स्वच्छता केली. रात्री ०८ वाजता ग्रामसभा घेवून ग्रामस्थांशी चर्चा करुन सुसंवाद साधला.

या शिबीराचे उद्घाटन दि. १० जानेवारी २०२४, बुधवार रोजी सकाळी ११.०० वाजता जालन्याचे उपजिल्हाधिकारी श्रीमती मनिषा दांडगे यांच्या हस्ते झाले. यावेळी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. गणेश अग्निहोत्री हे होते. व्यासपीठावर डोंगरगांव (सायगाव) येथील सरपंच श्रीमती चंद्रकला रिठे, उपसरपंच श्रीमती निर्मला घनघाव, प्रगतशील शेतकरी श्री. नाथा पाटील घनघाव, श्री. शत्रुघ्न बरांडे, श्री. नारायण रिठ, राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रमाधिकारी प्रा. राजेश सरकटे प्रा. योगेश लहामटे, डॉ. मनिषा सुतार`, ग्रामसेविका श्रीमती काशी वाघ, पर्यवेक्षक प्रा. प्रविण बाफना आदींची उपस्थिती होती.

यावेळी उद्घाटक म्हणून बोलतांना मा. उपजिल्हाधिकारी श्रीमती मनिषा दांडगे म्हणाल्या की, विद्यार्थ्यांसाठी सर्वच कामे सारखी असून, त्यांनी श्रम करण्याची लाज वाटू देवू नये. युवा शक्ती देशामध्ये चैतन्य घडवू शकते. श्रमदानातून रस्ते, बंधारे, जॅगिंग ट्रॅक, ग्रामस्वच्छता, पादंणमुक्त गाव अशी अनेक विधायक विकास कामे यापुर्वी झालेली आहेत. आजच्या वर्तमान परिस्थितीत युवा शक्तीच देशामध्ये बदल घडवू शकतात, असेही श्रीमती दांडगे यांनी सांगितले.

यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून बोलतांना श्री. नाथा पाटील घनघाव म्हणाले की, शेतकऱ्यांनी पारंपारिक शेतीकडे न वळता फळबागांची लागवड करुन आर्थिक समृद्ध व्हावे. तसेच शेतीस जोडधंदा म्हणून दुग्धव्यवसायही करावे. यामुळे नैसर्गिक आपत्ती व दुष्काळ या संकटावर शेतकऱ्यांना मात करता येईल, ही असेही त्यांनी सांगितले.

अध्यक्षीय समारोप करतांना प्राचार्य डॉ. गणेश अग्निहोत्री म्हणाले की, युवकच देशात श्रमदानातून क्रांती घडवू शकतात. युवा शक्ती ही राष्ट्राची शक्ती असून त्याचे ज्ञान आजच्या युवकांना होणे गरजेचे आहे.

कार्यक्रमाचे सुत्रसंचालन प्रा. राजेश सरकटे यांनी केले तर प्रास्ताविक डॉ. राजेंद्र सोनवणे यांनी केले. उपस्थितांचे आभार योगेश लहामटे यांनी मानले. याच दिवशी ३.३० वाजता महिला मेळावा चे आयोजन करण्यात आले होते. यावेळी महिलांचे सबलीकरण या विषयावर प्रा.डॉ. सुजाता देवरे यांनी महिलांना सक्षम होण्याचे आवाहन करुन आर्थिक बचत करण्याचा सल्लाही दिला. महिला सक्षम तर देश सक्षम असेही त्या म्हणाल्या.

रात्री ०७.०० वाजता सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी शिबीरार्थी विद्यार्थ्यांनी विविध कला गुणांचे सादरीकरण केले. सांस्कृतिक कार्यक्रम शिबीरार्थी विद्यार्थ्यांनी विविध मनोरंजनातून लोकसंवाद साधला. यावेळी

विद्यार्थ्यांनी नकला, पोवाडे, लघुनाटिका, लोकगीते, फिल्मे गीते, भारुडे सादर करुन उपस्थितांचे मनोरंजन केले.

दि. ११ जानेवारी २०२४ गुरुवार रोजी दुपारी २.३० वाजता शेतीविषयक कायदे व मार्गदर्शन या विषयावर जालना जिल्हा सत्र न्यायालयाचे सरकारी अभियोक्ता ॲड. दिपक कोल्हे यांच्या व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. प्रमुख वक्ते म्हणून मार्गदर्शन करतांन ॲड. दिपक कोल्हे म्हणाले की, शेतकऱ्यांनी शेतीविषयक कायदे समजून घेवून आपसात बांधावरुन न भांडता तंटामुक्ती अभियानातंर्गत गावातच आपल्या समस्या सोडवाव्यात. कोर्ट, कचऱ्यांच्या नादात वेळ व पैसा वाया जात असून शेतकऱ्यांचे मानसिक खच्चीकरण होते. विविध शेतीविषयक कायद्यांचीही माहिती श्री. कोल्हे यांनी यावेळी सांगितली. या कार्यक्रमास ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी कार्यक्रमाच्या अध्यक्षपदी डॉ. वसंत पवार हे होते. तर प्रमुख उपस्थित डॉ. विलास जाधव, प्रा. किशोर तापडीया यांची उपस्थिती होती.

रात्री ७ वाजता स्वच्छता विषयक प्रवचन महानुभाव दत्तआश्रम, वरझडी, ता.जि. छत्रपती संभाजीनगर येथील महंत बाभूळगांवकर शास्त्री यांनी स्वच्छता विषयक प्रवचन देवून लोकांना सार्वजनिक स्वच्छतेचे आव्हान केले. घर स्वच्छ तर मन स्वच्छ, विचारही स्वच्छ असतात असेही त्यांनी सांगितले. यावेळी ग्रामस्थांची उपस्थिती मोठ्या प्रमाणात होती.

दि. १२ जानेवारी २०२४, शुक्रवार रोजी ०२.३० वाजता कृषी विकासासाठी शेतकऱ्यांचे योगदान या विषयावर जालना जिल्हा कृषी अधिकारी आर. जे. कापसे यांच्या व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी बोलतांना श्री. कापसे म्हणाले की, भारत हा कृषीप्रधान देश असून, मायबाप शेतकरी हा देशाचा पोशिंदा आहे. तो सुखी तर सर्व जग सुखी. आजच्या कृषी विषयक अन्नधान्य, फळे, भाजीपाला यामध्ये झालेल्या कृषी

विषयक क्रांतीमध्ये शेतकऱ्यांचे योगदान मोठ्या प्रमाणात आहे. म्हणूनच भारतात अन्नधान्याची मुबलकता आहे, असेही श्री. कापसे यांनी सांगितले. यावेळी कार्यक्रमाच्या अध्यक्षपदी जे. ई. एस. महाविद्यालयाचे अर्थशास्त्र विभागप्रमुख डॉ. दिलीप अर्जुने होते. तर प्रमुख उपस्थिती डॉ. सुशांत देशमुख, डॉ. अमोल खांडेभराड यांची उपस्थिती होती.

दुपारी ०४.३० वाजता ऑनलाईन फसवणूक व प्रतिबंधक उपाय योजना या विषयावर सॉफ्टेक कॉम्प्युटर, जुना जालना येथील श्री. राजेश कल्याण यांच्या व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. आजकाल ऑनलाईन फसवणूक मोठ्या प्रमाणावर होत असून, सायबर गुन्ह्याचे प्रमाण वाढले आहे. महिला, मुली, तरुण युवक, व्यापारी, शासकीय कर्मचारी यांची बक्षिसांचे अमिष दाखवून मोठ्या प्रमाणावर फसवणूक होते. आपला ओटीपी, आधारकार्ड, बँक अकांट नंबर कुणालाही देवू नये, असेही डॉ. सरकटे यांनी सांगितले. यावेळी कार्यक्रमाच्या अध्यक्षपदी जे. ई. एस. महाविद्यालयाचे रसायनशास्त्र विभाग प्रमुख डॉ. सुनिल मिरगणे होते यावेळी डॉ. नानासाहेब गोरे, प्रा.सुर्यकांत चौगुले. प्रा. संतोष मुंदडा यांची उपस्थिती होती.

रात्री ७ वाजता डोंगरगाव (सायगाव) येथील ग्रामस्थ भजनी मंडळातर्फे भजनाचा कार्यक्रम ठेवण्यता आलेला होता यावेळी गवळीणी, एकतारी भजने, तसेच एकनाथांची भारुडे विरहण्या भजनी मंडळांनी सादर करुन उपस्थितांची मने जिंकली.

दि. १३ जानेवारी २०२४, शनिवार रोजी दु. ०२.३० वाजता स्पर्धा परीक्षा तयारी व मार्गदर्शन या विषयावर जेईएस महाविद्यालयाचे माजी उपप्राचार्य प्रा. बी. वाय. कुलकर्णी यांच्या व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षपदी डॉ. नानासाहेब गोरे हे होते. यावेळी डॉ. प्रविण चंदनशिवे, प्रा. किशोर तापडीया, प्रा. सचिन निसर्गन यांची उपस्थिती होती. स्पर्धा परीक्षेवर बोलतांना प्रा.कुलकर्णी म्हणाले की, युवकांनी स्पर्धा परीक्षेची तयारी करतांना सामान्य ज्ञानाचा अभ्यास करावा. भूगोलाचे व

इतिहासाचे ज्ञानही आवश्यक असून, आवडीच्या विषयाचे सखोल ज्ञान प्राप्त करावे. तरच स्पर्धा परीक्षेत निश्चित यश मिळते, असेही प्रा. कुलकर्णी यांनी सांगितले.

दुपारी ०४.३० वाजता मानसिक आजार व उपचार या विषयावर जिल्हा सामान्य रुग्णालय, जालना येथील मनोरुग्ण उपचार तज्ञ श्री. प्रदिप शिंदे व श्री. अंकित गिराम यांच्या व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षपदी डॉ. नागनाथ शेवाळे हे होते. युवकांमध्ये अनुवंशिक व जन्मजात मानसिक आजार संक्रमीत होत असतात. त्यावर योग्यवेळी उपचार व इलाज केल्यास व्यक्ती बरी होते. आजकाल युवक व्यसनाधिन झाल्यामुळे मानसिक आजाराचे प्रमाण वाढले आहे. व्यसन हे सुद्धा हे मानसिक आजार आहे. यासाठी दैनदिन जीवन पद्धतीत बदल करणे आवश्यक आहे, असेही श्री. शिंदे यांनी सांगितले. श्री. गिराम यांनी मनोरुग्णांवर महाराष्ट्रात कोठे कोठे शासनाकडून मोफत उपचार होतात, याची माहिती दिली.

रात्री ७ वाजता डोंगरगाव (सायगाव) येथे शिबीरार्थी व ग्रामस्थांसाठी कवी संमेलनाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी प्रा. बी. जी. श्रीरामे, डॉ. फुलचंद मोहिते, प्रा. शिवाजी वानरे, डॉ. बाबासाहेब वाघ, प्रा. शिवानंद मुंढे, प्रा. खंडागळे व शिबीरार्थी कवी यांनी एकाहून एक दर्जेदार कवितांचे सादरीकरण केले. कवी संमेलनाच्या अध्यक्षपदी प्रा. हेमंत वर्मा हे होते. त्यांनी हिंदी कविता सादर करुन प्रेक्षकांची वाह वाह मिळवली.

दि. १४ जानेवारी २०२४ रविवार रोजी दुपारी ०२.३० वाजता माती परिक्षण व उपाययोजना या विषयावर वनस्पतीशास्त्र विभागप्रमुख डॉ. उमेश मोगले यांच्या व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी कार्यक्रमाच्या अध्यक्षपदी डॉ. लक्ष्मीकांत शिंदे हे होते. तर डॉ. गणेश रोकडे, प्रा. मनोज महेर यांची उपस्थिती होती. माती परिक्षण ही काळाची गरज असून, मातीतील मुद्रा कळाल्यास शेतकऱ्यांना योग्य ती

पिके घेता येतात. रसायनीक खते व किटकनाशके याच्यामुळे जमीनीची पोत खराब झाली असून, ती नापिक झाली आहे. यासाठी सेंद्रीय खतांचा वापर करुन आधुनिक तंत्रज्ञान पद्धतीने शेती करावी, असेही डॉ. मोगले यांनी सांगितले.

रात्री ७ वाजता बोध संध्याचे आयोजन करण्यात आले होते. ७ दिवसीय शिबीर कालावधीत मौजे डोंगरगांव (सायगाव) येथे केलेल्या श्रमदानाच्या कामाचा आढावा घेण्यात आला. शिबीरार्थींनी गावाशेजारील पावनधाम येथे १.५ कि. मी. चा जॅगिंग ट्रॅक तयार केल्याने ग्रामस्थांनी समाधान व्यक्त केले. या व्यतिरिक्त गावातील नाल व कचऱ्याची साफ-सफाई केली. पुढील काळात या गावासाठी काय करता येईल याबाबत चिंतन करुन गावकऱ्यांशी संवाद साधण्यात आला.

दि. १२ जानेवारी २०२४ शुक्रवार रोजी दु. ०३.३० वाजता एचआयव्ही/एड्स चिकित्सा विषयी आरोग्य शिबीराचेही ग्रामस्थांसाठी आयोजन करण्यात आले होते. यावेळी जालना जिल्हा सामन्य रुग्णालयाच्या जिल्हा एडस् नियंत्रण पथकाच्या डॉ. प्राजक्ता जोशी यांनी शिबीरार्थींना व ग्रामस्थांच्या रक्ताचे नमुने घेवून एचआयव्हीची टेस्ट घेतली. एड्स रोगाविषयी मार्गदर्शन केले. तसेच या रोगाविषयी वैद्यकीय समुपदेशन करतांना म्हणाले की, एड्स हा भयंकर आजार असून, यावर आजपावेतो खात्रीलायक उपचार पद्धतीचे संशोधन झालेले नाही. युवकांनी क्षणीक मोहाला बळी न पडता भविष्याचा विचार करुन आचरण करावे. म्हणजे स्वतःचे आरोग्य सुव्यवस्थीत ठेवता येईल.

या शिबीर काळात दि. १४ जानेवारी २०२४ रविवार रोजी सकाळी १० वाजता ग्रामस्थांची शतायु हॉस्पिटल जालना तर्फे डॉ. किशोर टेपले व डॉ. सौ. टेपले यांनी मोफत

आरोग्य तपासणी केली. यावेळी उच्च रक्तदाब, मघुमेह, श्वसन विकार आदी रोगांच्या रुग्णांना मोफत औषधीही वाटप करण्यात आल्या.

दि. १४ जानेवारी २०२४ रविवार रोजी सकाळी ०८.०० वाजता माझे स्वच्छ घर, सुंदर घर या विषयावर डोंगरगांव (सायगाव) येथील महिला ग्रामस्थांसाठी ठेवण्यात आलेली होती. जे. ई. एस. महाविद्यालय, जालनातर्फे प्रथम क्रमांकासाठी ३०००/-, द्वितीय क्रमांकासाठी २०००/-, तृतीय क्रमांकासाठी १०००/- बक्षिस ठेवण्यात आलेले होते. याच स्पर्धेमध्ये संपूर्ण गावातील महिलांनी सहभाग नोंदविला. प्रथम क्रमांकाचे बक्षिस श्रीमती राधाबाई घनघाव तर द्वितीय क्रमांकाचे श्रीमती सावित्रीबाई आटोळे तर तृतीय क्रमांकाचे कु. कुंदा बरांडे यांनी मिळविले.

दि. १५ जानेवारी २०२४, सोमवार रोजी दु. १२.०० वाजता शिबीराचा समारोपाचा कार्यक्रम संपन्न झाला. यावेळी कार्यक्रमाच्या अध्यक्षपदी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. गणेश अग्निहोत्री हे होते तर प्रमुख पाहुणे म्हणून कृषीभूषण श्री. विजयअण्णा बोराडे, अध्यक्ष कृषी विज्ञान केंद्र खरपुडी हे होते. तर प्रमुख पाहुणे म्हणून प्रगतशील शेतकरी श्री. नाथा श्रीरंग घनघाव व प्राचार्य डॉ.भारत खंदारे, डॉ. बद्रीनाथ घोंगे हे होते.

यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून बोलतांना कृषीभूषण श्री. विजयअण्णा बोराडे म्हणाले की, युवकांसाठी सर्वच कामे सारखी असून, श्रम हेच खरे दैवत आहे. श्रमामुळे क्रांती घडते. श्रमाचे महत्व फार मोठे असून, आज मोठ-मोठ्या उद्योगपतींच्या यशोगाथेतून श्रमाचे महत्व कळते. शेतकरी जसे श्रमातून मळा, शेती पिकवितो तसेच आपण कठोर श्रम करुन युवकांनी यश प्राप्ती करावी, असेही श्री. बोराडे म्हणाले.

यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून बोलतांना श्री. नाथापाटील श्रीरंग घनघाव म्हणाले की, शेतकऱ्यांनी आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करुन शेती करावी. फळबागाची लागवड करावी. यामुळे शेतकऱ्यांना नगदी कमाई होते व जीवनमान उंचावते. यासाठी पाणी अडवा-पाणी जिरवा या संकल्पनेतून शिवारा शिवारात बंधारे बांधून पाणी अडवावे.

त्यामुळे जमीनीतील जलपातळी वाढेल, पिकांना पाणी देता येईल, असेही श्री. घनघाव म्हणाले.

प्राचार्य डॉ. भारत खंदारे म्हणाले की, युवकांनी ग्रामस्थांसाठी १.५ कि. मी. जॅगिंग ट्रॅक श्रमदानातून केला, ही गोष्ट गौरवास्पद असून, आपल्या दैनंदिन जिवनातही स्वावलंबी होवून स्वतःची कामे युवकांनी करावीत, असेही डॉ. खंदारे यांनी सांगितले.

अध्यक्षीय समारोप करतांना प्राचार्य डॉ. गणेश अग्निहोत्री म्हणाले की, युवकांनी श्रमदानाचे महत्व जाणून घेवून श्रमातून क्रांती करावी व आपले जीवन सुखी संपन्न करावे, असेही डॉ.अग्निहोत्री म्हणाले.

यावेळी कार्यक्रमाचे प्रास्ताविक कार्यक्रमाधिकारी डॉ. राजेंद्र सोनवणे यांनी केले. सात दिवशीय शिबीर कालावधीत राष्ट्रीय सेवा योजनेच्या विद्यार्थ्यांनी केलेल्या श्रमदानाच्या कामाची माहिती त्यांनी सांगितली. विद्यार्थ्यांनी मनावर घेतले तर कोणतीच गोष्ट अशक्य नाही. शिबीरार्थी विद्यार्थी यांनी डोंगरगाव (सायगाव) येथे गावाशेजारील पावनधाम येथे १.५ कि. मी. अंतराचा जॅगिंग ट्रॅक तयार केल्याबद्दल शिबीरार्थींचे कौतूक केले. तसेच वृक्षरोपणासाठी खड्डेही तयार करुन दिले व नाल्या व कचऱ्याची साफसफाई केली.

यावेळी डोंगरगाव (सायगाव) येथील सरपंच श्रीमती चंद्रकलाबाई रिठे यांनी आपल्या भाषणातून विद्यार्थ्यांनी केलेल्या कामाचे कौतूक केले. तसेच विद्यार्थ्यांनी केलेल्या डोंगरगाव (सायगाव) येथे गावाशेजारील पावनधाम येथे १.५ कि. मी. अंतराचा जॅगिंग ट्रॅक तयार केल्याबद्दल शिबीरार्थींचे कौतूक करुन राष्ट्रीय सेवा योजनेला धन्यवाद देत असल्याचे सांगितले. गावातील भिंतीवर घोषवाक्य लिहिलीत. त्याबद्दल विद्यार्थ्यांचे विशेष शाबासकी देवून कौतूक केले.

संपूर्ण डोंगरगाव (सायगाव) गावची झाडूने स्वच्छता करुन गावात स्वच्छतेचा संदेश देणारी रॅलीही समारोपाच्या दिवशी काढण्यात आली. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन डॉ. राजेश सरकटे यांनी केले. शेवटी उपस्थितांचे आभार प्रदर्शन प्रा. योगेश लहामटे यांनी मानलेत.

शिबीरात विद्यार्थ्यांची दैनंदिनी खालील प्रमाणे होती.

| | | |
|---|---|---|
| सकाळी | ५.०० ते ५.३० | प्रात:विधी |
| | ५.३० ते ७.०० | प्रार्थना, योगा, सुविचार |
| | ७.३० ते ८.३० | ग्रामस्वच्छता |
| | ८.०० ते १२.०० | श्रमसंस्कार |
| दुपारी | १२.०० ते २.०० | भोजन व विश्रांती |
| | २.०० ते ४.०० | बौध्दीक चर्चासत्र |
| सांयकाळी | ५.०० ते ६.०० | मुक्त वेळ-खेळ व मंनोरजन |
| | ६.०० ते ७.०० | भोजन |
| रात्री | ८.०० ते १०.०० | सांस्कृतिक कार्यक्रम |
| | १०.०० | विश्रांती. |

हे विशेष श्रमसंस्कार शिबीर पार पडण्यासाठी प्राचार्य डॉ. गणेश अग्निहोत्री यांचे बहुमोल मार्गदर्शन व सहकार्य लाभले कनिष्ठ महाविद्यालयाचे उपप्राचार्य प्रा. व्ही. के. पगारे, पर्यवेक्षक प्रा. पी. सी. बाफना, पर्यवक्षिका श्रीमती प्रा. करुणा वासनिक यांचे मोलाचे सहकार्य लाभले तसेच संयोजनासाठी प्रा. राजेश सरकटे, प्रा. योगेश लहामटे, डॉ. मनिषा सुतार, प्रा. डॉ. मोनिका काळे, प्रा. श्रीमती रंजना येपुरवार, प्रबंधक श्री.अशोक फदाट, कार्यालयीन अधिक्षक श्री. बी. जी. साळूंके, सेवक श्री. विजय सुलाने, श्री. भरत अहिरे, श्री. बबलू टेकाळे, श्री. संजय फदाट, श्री. विलास बोधले श्री. शामराव राठोड तसेच शासकीय - निमशासकीय अधिकारी, कर्मचारी, जे.ई.एस. महाविद्यालयातील सर्व

प्राध्यापक व शिक्षकेत्तर कर्मचारी व शिबीरार्थी विद्यार्थ्यांचे शिबीर यशस्वी करण्यासाठी सहकार्य लाभले.

श्रम हेच खरे दैवत आहे, हे शिबीरातुन विद्यार्थ्यांना समजले, सुप्रसिद्ध मराठीतील कवियीत्री शांताबाई जावळे यांच्या शब्दात सांगायचे झाल्यास...........

श्रमाने पिकवतील शेती-वाडी ।।
श्रमाने पिकवतील हिरे मोती ।
श्रमाने फुलवतील फळबागा ।।

जे. ई. एस. शिक्षण संस्थेच्या आमच्या जे. ई. एस. महाविद्यालयातील सन २०२३-२४ या शैक्षणिक वर्षातील विशेष श्रम संस्कार वार्षिक शिबीर मौजे डोंगरगाव (सायगाव), ता. बदनापूर, जि. जालना येथे व्यवस्थित संपन्न झाले. ही आमच्यासाठी आनंदाची बाब असून शिबीरास सहकार्य करणाऱ्या सर्वाचे आभार व्यक्त करून विशेष श्रमसंस्कार शिबीराचा वार्षिक अहवाल पूर्ण करतो.

धन्यवाद !

१) प्रा. राजेश सरकटे
२) प्रा. योगेश लहामटे
३) डॉ. मनिषा सुतार
कार्यक्रमाधिकारी. राष्ट्रीय सेवा योजना
(वरिष्ठ महाविद्यालय)
जे.ई.एस.महाविद्यालय, जालना.

डॉ. जी. एम. अग्निहोत्री
प्राचार्य.
जे.ई.एस.महाविद्यालय, जालना.
जिल्हा - जालना.




**विशेष श्रम संस्कार शिबिराला निघतांना प्रा. डॉ. गणेश अग्निहोत्री सरासोबत काही विद्यार्थी व कार्यक्रम अधिकारी**




**राष्ट्रीय सेवा योजनेच्या विशेष श्रमशिबिराच्या उदघाटन प्रसंग**




विशेष श्रमशिबिरामध्ये आयोजित महिला मेळाव्या मार्गदर्शन करताना प्रा. डॉ. सुजाता देवरे मॅडम




विशेष श्रमशिबिरामधे स्पर्धा परीक्षेचे स्वरूप व त्याची तयारी या विषयवर आयोजित
प्रा. डॉ. बी आर. अग्रवाल सरांचे व्याख्यान







विशेष श्रमशिबिरामधील दैनंदिन सकाळचा व्यायाम करवून घेताना

कार्यक्रम अधिकारी प्रा. राजेश सरकटे




विशेष श्रमशिबिरामधील श्रमदान करताना सहभागी विद्यार्थीनी




विशेष श्रमशिबिरामधील श्रमदान करताना सहभागी विद्यार्थी




विशेष श्रमशिबिरामधील आयोजित व्याख्यान सत्राचे सूत्रसंचालन करताना विद्यार्थी समाधान काळुंखे




विशेष श्रमशिबिरामधील आयोजित व्याख्यान सत्र




**विशेष श्रमशिबिरामधील आयोजित ऍडव्होकेट श्री. दीपक कोल्हे सरांचे व्याख्यान**




स्वामी विवेकानंदांच्या जयंती निमित्य आयोजित जनजागृती रॅली




राष्ट्रमाता माँ जिजाऊ जयंती निमित्य आयोजित जनजागृती रॅली




राष्ट्रमाता माँ जिजाऊ जयंती साजरी करताना शिबिरातील विद्यार्थी व कार्यक्रम अधिकारी




भजनाच्या माध्यमातून गावकर्यांना जनजागृती करताना शिबीरातील एक क्षण




भारुडाच्या माध्यमातून गावकर्यांना जनजागृती करतानाचा एक क्षण




शिबिरातील श्रमदाना अंतर्गत पावनधाम गडांवर 1.5 किलोमीटर चा धावण्याचा मार्ग तयार करताना




विशेष श्रमशिबिरामधील आयोजित मानसिक स्वस्थ व संगोपन या विषयावरील व्याख्यान




शिबिरात आयोजित मानसोपचार सत्रा मध्ये विद्यार्थ्यांशी संवाद साधताना जिल्हा सामान्य रुग्णालयातील मानसोपचार तज्ज्ञ




विद्यार्थ्यांच्या काव्य गुणांना प्रोत्साहन देण्यासाठी आयोजित काव्यसंध्या कार्यक्रम




शिबिरातील श्रमदाना अंतर्गत पावनधाम गडांवर स्वच्छता करताना विद्यार्थीनी




शिबिरातील श्रमदानासाठी महाविद्यालयाचे माजी रासयो कार्यक्रमाधिकारी
प्रा. डॉ. गणेश रोकडे प्रा. मनोज महेर सर यांचा सहभाग




विशेष श्रमशिबिरामधे माती परीक्षण व त्याचे महत्व या विषयवर आयोजित
प्रा. डॉ. उमेश मोगल सरांचे व्याख्यान




कीर्तनातुन समाजातील बाल विवाह, नशाबंदी सारख्या वाईट चालीरीतीवर समाज प्रभधान करतांना शिबीरातील विद्यार्थी आदित्य गोमटे व सहकारी विद्यार्थी




शिबिरातील विद्यार्थी ग्राम स्वच्छता करताना सहभागी विद्यार्थीनी




गावातील बसस्थानकाची स्वच्छता करताना शिबिरातील सहभागी विद्यार्थीनी




गावातील बसस्थानकाची स्वच्छता झाल्यानंतर शिबिरातील सहभागी विद्यार्थी व विद्यार्थिनी




शिबिरातील श्रमदाना अंतर्गत पावनधाम गडांवर १.५ किलोमीटर चा धावण्याचा मार्ग तयार झाल्यावर पाहणी करताना गावकरी





शिबीर समारोप प्रसंगी मनोगत व्यक्त करताना शिबिरातील सहभागी कु. धनश्री कळकुंबे विद्यार्थीनी




गावातील बसस्थानकाची स्वच्छता करताना शिबिरातील सहभागी विद्यार्थीनी




गावातील बसस्थानकाची स्वच्छता झाल्यानंतर शिबिरातील सहभागी विद्यार्थी व विद्यार्थिनी






**पाणी गरम करण्यासाठी चुलीला लागणारी वाळलेली लाकडे घेऊन जाताना**




**कीर्तनातुन समाजातील बाल विवाह, नशाबंदी सारख्या वाईट चालीरीतीवर समाज प्रभधान करतांना शिबीरातील विद्यार्थी आदित्य गोमटे व सहकारी विद्यार्थी**




शिबीर समारोप प्रसंगी प्रमुख पाहुणे श्री. विजयअण्णा बोराडे सरांचे विद्यार्थ्यांना मार्गदर्शन




शिबीर समारोप प्रसंगी प्रमुख पाहुणे श्री. बाभूळगावकर शास्त्री महाराज यांचे विद्यार्थ्यांना मार्गदर्शन